कल्याण येथे झालेल्या दुर्घटनांमध्ये अग्निशमन व बचावकार्य करत असताना वीरमरण आलेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागातील जवानांना "शहीद" दर्जा व शहीदांना अनुज्ञेय असणाऱ्या सवलती व फायदे देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक:- कडोंम-१०१९/प्र.क्र.१७/नवि-२८
मंत्रालय (मुख्य इमारत), ४ था मजला,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ०५ ऑगस्ट, २०१९

संदर्भ:- १) कल्याण-डोंबिवली महानगरपालिका सर्वसाधारण सभा ठराव क्र.१०० व १०९, दि.२०.१२.२०१८.
२) आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांचे जा.क्र.कडोंमपा/अग्नि/मुका/१२०१८००००००९, दि.०१.०१.२०१९
३) शासन निर्णय गृह विभाग क्र.पीडब्ल्यूएफ-०२०९/प्र.क्र.१०७/पोल-७, दि.०६.०२.२००९
४) शासन निर्णय गृह विभाग क्र.पीडब्ल्यूएफ-१११०/प्र.क्र.६९६/पोल-७, दि.०१.०६.२०११

प्रस्तावना:-

दि.०१.११.२०१८ रोजी चक्कीनाका, कल्याण (पूर्व) येथे विहिरीत पडलेल्या तीन इसमांचे बचावकार्य करत असताना कै.अनंत वसंत शेलार व कै.प्रमोद शनिवार वाघचौडे, दोघेही फायरमन, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका व दि.२९.११.२०१८ रोजी गोल्डन पार्क, कल्याण (प.) येथे दुकांनाच्या गाळयामध्ये लागलेली आग विझविताना तसेच बचावकार्य करत असताना कै.जगन गोविंद आमले, लिडिंग फायरमन, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांना वीरमरण आले. कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाच्या या ३ जवानांना त्यांच्या मृत्यूपश्चात "शहीद" असा दर्जा देण्याचा ठराव कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेने वरील संदर्भ क्र. १ अन्वये पारित केला. त्याचप्रमाणे वीरमरण आलेल्या या ३ जवानांना "शहीद" दर्जा तसेच शहीदांना अनुज्ञेय असलेल्या सवलती व फायदे मिळण्याची विनंती आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका यांनी संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये केली. उक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय:-

कल्याण येथे झालेल्या दुर्घटनांमध्ये अग्निशमन व बचावकार्य करत असताना वीरमरण आलेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या खालील कर्मचाऱ्यांना त्यांच्या मृत्यूपश्चात "शहीद" दर्जा बहाल करण्यात येत आहे.

१) कै.अनंत वसंत शेलार, फायरमन.
२) कै.प्रमोद शनिवार वाघचौडे, फायरमन.
३) कै.जगन गोविंद आमले, लिडिंग फायरमन.

२. वीरमरण आलेल्या कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या अग्निशमन सेवेतील या तीनही जवानांना संदर्भ क्र.३ व ४ येथील शासन निर्णयानुसार नक्षलवाद विरोधात कारवाई करताना नक्षलवादी हल्ल्यात मृत व जखमी झालेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सवलतींच्या धर्तीवर पुढीलप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या सवलती व फायदे कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या निधीतून देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

अ.क्र.	सवलत	तपशील
१.	सदनिका	१) अग्निशमन दलातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना कुटुंबियांना निवासी जिल्ह्यात किंवा निवासी जिल्ह्याच्या ज्या महसूल विभागात समावेश होतो त्या महसूल विभागातील त्यांच्या पसंतीच्या ठिकाणी एक सदनिका विनामुल्य, ज्या ठिकाणी म्हाडाची योजना असेल तेथे त्या योजनेअंतर्गत एक सदनिका देण्यात यावी. २) सदनिका उपलब्ध नसेल तर अनुज्ञेय क्षेत्रफळानुसार रु.३०००/- प्रती चौ.फुट या दराने रोख रक्कम. ३) अनुज्ञेय क्षेत्रफळ:- वर्ग अ- १००० चौ.फूट वर्ग ब- ८०० चौ.फूट वर्ग क- ७५० चौ.फूट वर्ग ड- ६०० चौ.फूट
२.	अनुकंपा तत्वावर सेवेत नियुक्ती	शैक्षणिक अर्हता व पात्रतेनुसार कुटुंबियांपैकी एकास महानगरपालिकेत अनुकंपा तत्वावर नियुक्ती.
३.	सानुग्रह अनुदान	रु.२५ लाख सानुग्रह अनुदान कायदेशीर वारसदारांच्या संयुक्त नावाने मुदत ठेव म्हणून देण्यात येईल. सदर निधी १० वर्षापर्यंत काढता येणार नाही. व्याज रक्कम दर महिन्याला देता येईल.
४.	मोफत शिक्षण	दोन अपत्यांचा देशांतर्गत शाळा/महाविद्यालयीन खर्च.
५.	वेतन	असा अधिकारी/कर्मचारी जणू काही मृत झाली नव्हती असे मानून सदर व्यक्तीला सेवेत असताना जे वेतन मिळाले असते ते वेतन त्याच्या कुटुंबियांना देय होईल. सदर व्यक्ती मृत्यूचा वेळी जे पद धारण करीत होती त्या पदावरुन वरिष्ठ पदावर पदोन्नतीसाठी ज्या ज्या वेळी पात्र असेल त्या त्या वेळी सदर व्यक्ती पदोन्नत झाली असे गृहीत धरुन त्या व्यक्तीची वेतन निश्चिती करण्यात यावी आणि त्यानुसार सेवा निवृत्तीच्या दिनांकापर्यंत वेतन देय राहील. या कालावधीत नियमानुसार वार्षिक वेतनवाढी सुद्धा अनुज्ञेय राहील.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक २०१९०७३११०९५३४५९४२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Navnath Ravaji Wath

Digitally signed by Navnath Ravaji Wath
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=885bfbac1d8ef74e3ffe622f226b31d75c2a13f319632f0da72fd54e57ac00ff, serialNumber=30e05bf6f1ed11d82b5689c9fc6b47a271a6b22790a9388dba7f3db15e247ff5, cn=Navnath Ravaji Wath
Date: 2019.08.05 15:19:17 +05'30'

(नवनाथ रा. वाठ)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) महापौर, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, जिल्हा-ठाणे.
३) आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, जिल्हा-ठाणे.
४) मा.राज्यमंत्री (नगर विकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
५) प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) निवडनस्ती (नवि-२८).